# आरोग्य विभाग

## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली

**E-mail** – dho_gad@rediffmail.com

## रोजंदारी पद्धतीने मलेरिया मोबाईल युनिट पदभरती

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे स्तरावर आरईसी फाऊंडेशन मार्फत सीएसआर निधीतून भामरागड व एटापल्ली तालुक्यात प्रत्येकी १ याप्रमाणे २ मलेरिया मोबाईल युनिट कार्यान्वीत करण्यासाठी ३ महिन्यासाठी रोजंदारी पद्धतीने खालीलप्रमाणे पदे भरण्याकरिता अर्हताप्राप्त इच्छूक उमेदवारांकडून फक्त Google Form च्या माध्यमातून Online अर्ज मागविण्यात येत आहेत.

### रोजंदारी पद्धतीने भरावयाची पदे

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | रिक्त ठिकाण | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | Etapalli Bhamragad | 2 | MBBS OR BAMS with valid registration | ५०,०००/- |
| २ | स्टॉफ नर्स / एएनएम | Etapalli Bhamragad | 2 | ANM OR GNM OR B.Sc Nursing with MNC Registration | १८,०००/- |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | Etapalli Bhamragad | 2 | 12th Science + DMLT with MSBTE registration | १८,०००/- |
| ४ | वाहन चालक | Etapalli Bhamragad | 2 | SSC Pass with Valid LMV Driving License | १५,०००/- |
| ५ | डॉटा एन्ट्री ऑपरेटर | DHO Office Gadchiroli | 1 | Any graduate with Typing skill, Marathi - 30 words per minute , English 40 words per minute with MSCIT | १०,०००/- |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदरची पदे निव्वळ रोजंदारी तत्वावरील असून राज्य शासनाची नाहीत.

२) पदांसमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतीरीक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३) निवड झालेल्या उमेदवारांना ३ महिन्यापर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता सदर प्रकल्पास व पदांना मंजूरी मिळाल्यानंतरच तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्यासच पुढील कालावधीकरीता नियुक्तीचा विचार केल्या जाईल. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

४) संबधित पदाकरिता ईच्छूक व अर्हताधारक उमेदवारांकडून Google Form Link च्या माध्यमातून फक्त Online स्वरुपात जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अर्ज मागविण्यात येत असून उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या Link चा वापर करावयाचा आहे. सदर Link **दिनांक 0९./0९./२०२६ ते दिनांक २0./0९./२०२६ रोजी रात्रौ ११.५० वाजेपर्यंत** सुरु राहील. त्यानंतर सदर Link बंद केल्या जाईल. त्यामुळे विहित मुदतीत Online स्वरुपात अर्ज सादर करण्याची जबाबदारी ही उमेदवारांची राहील. **Offline स्वरुपात (पोस्टाने किंवा समक्ष) सादर केलेले कोणतेही अर्ज या कार्यालयाद्वारा स्विकारल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

५) Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारांच्या ईमेल वर Auto-Generated अर्जाची प्रत प्राप्त होईल. सदर अर्जाची प्रत उमेदवारांनी संपूर्ण भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत स्वत:कडे जपून ठेवावी. तसेच मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

६) भरतीप्रक्रियेबाबतच्या पुढील सर्व सुचना, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक ईत्यादी वेळोवेळी जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देण्याची जबाबदारी ही उमेदवारांची राहील, त्याबाबत उपरत कोणत्याही तक्रारीची दखल घेतल्या जाणार नाही.

७) उमेदवारांची निवड ही निव्वळ गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येणार असून उमेदवारांच्या निवडीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

| विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्ष/सेमिस्टर च्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० टक्के प्रमाणे Proportion=60*50/100=30) | ५० गुण |
| पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावे. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० टक्के प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे २० टक्के प्रमाणे Proportion=60*20/100=20) | २० गुण |
| संबधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षासाठी ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| **एकूण गुण** | | **१०० गुण** |

उपरोक्तप्रमाणे एकूण १०० गुणांच्या आधारे गुणवत्तेनूसार अंतिम निवड करण्यात येईल.

८) उमेदवारांची अंतिम वर्षाची / सेमिस्टरची गुणपत्रिका ही टक्केवारी ऐवजी SGPA मध्ये असल्यास अशा उमेदवारांनी संबधित विद्यापिठाकडून SGPA हे टक्केवारी गुणांकन मध्ये रुपांतरीत (Convert SGPA to Percentage) करुन ते कागदपत्र पडताळणीचे वेळी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांना गुण दिल्या जाणार नाही.

९) विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी करुन उमेदवारांच्या अर्जाच्या पात्रतेबाबत, गुणांकनाबाबत यादी तसेच मुलाखतीचे/ मुळ कागदपत्र तपासणीचे वेळापत्रक जिल्हा

परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. याकरीता उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविल्या जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक राहील.

१०) उमेदवार एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्हता धारण करीत असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज सादर करणे व प्रत्येक अर्जाकरिता स्वतंत्र भरती शुल्काची चालान भरणे बंधनकारक आहे.

११) उमेदवारांनी अर्ज सादर करतांना भरती शुल्क **रुपये १००/-** इतकी रक्कम खालील विवरणात नमुद बँक खात्यावर ऑनलाईन (इंटरनेट बँकींग, फोन पे, गुगल पे ईत्यादी) अथवा विवरणात नमुद बँक खात्यावर ऑफलाईन स्वरुपात रोखीने जमा करता येईल. सदर रक्कम ना-परतावा असेल. **धनादेश (Cheque) अथवा धनाकर्ष (DD) द्वारा शुल्क कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाही.**

**District Integrated Health & Family Welfare Society, Gadchiroli**

**A/c No. 11267751010**

**IFSC Code - SBIN0000298**
**State Bank of India, Gadchiroli Branch**

रक्कम भरणा केल्यानंतर प्राप्त होणारा व्यवहार क्रमांक (Transaction ID) ऑनलाईन अर्जात नोंदविणे व व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) / रोख भरणा पावती Online अर्ज भरतांना Upload करणे बंधनकारक आहे. त्यामुळे उमेदवारांनी सर्वप्रथम भरती शुल्काची रक्कम बँकेत भरणा करावी. त्यानंतरच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. सदर व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) प्रिंट करुन / रोख भरणा पावती निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उमेदवारांनी स्वतःजवळ काळजीपुर्वक जपून ठेवावे. तसेच त्याची १ प्रत मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी अर्जासोबत सादर करावी.

१२) **उमेदवारांची निवड पुर्ण करण्याआधी उमेदवारांना बोलावून त्यांचे अर्जाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सदर मुळ (Original) कागदपत्र, जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटूंबाचे नमुना-अ प्रपत्र, अर्ज भरल्याबाबत उमेदवारांच्या ईमेल वर प्राप्त झालेला फार्मची प्रिंट (Print) तसेच भरती शुल्काच्या व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) ची प्रिंट / रोख भरणा पावती ईत्यादी कागदपत्र पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी अनुपस्थित उमेदवारांचा कोणत्याही परिस्थितीत निवडीकरिता विचार करण्यात येणार नाही.**

१३) विहित अर्हता धारण करित नसलेले, अपूर्ण असलेले, विहित मुदतीत प्राप्त न झालेले, प्रवर्गानूसार पुर्ण शुल्क नसलेले तसेच एकाच पदाकरिता दोनदा केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१४) सदर पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात येणार असल्याने सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनूसरुन Online अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दिनांक 20./08./२०२६ रोजी** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे राहील.

१५) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या वेळी उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१६) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल. तसेच आवश्यक असल्यास प्रशासकिय व फौजदारी कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१७) ज्या तांत्रीक संवर्गातील पदांना विहित केलेल्या केन्द्र शासन अथवा राज्य शासनाच्या नोंदणी विभागाकडून वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे, अशा पदाच्या उमेदवारांनी मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी त्यांचे अर्जासोबत सदर वैध नोंदणी (Valid Registration) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

१८) उमेदवारांनी अर्ज सादर करतांना त्यांचे अद्यावत असलेले ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अचुक नोंदवावे. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहिल, याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना या कार्यालयामार्फत संपर्क करणे सोईस्कर होईल.

१९) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमूना-अ** या प्रपत्रात अर्जासोबत मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२०) उमेदवाराने अधिवास / राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जासोबत मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पदभरती ही विहित पद्धतीने व उमेदवारांच्या गुणवत्तेनूसार होत असून याकरिता या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारच्या रक्कमेची मागणी केल्या जात नाही. त्यामुळे अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला किंवा प्रलोभनाला बळी पडू नये. याउपरही उमेदवारांनी अथवा त्यांचे नातेवाईकांनी व्यवहार केल्यास, कोणत्याही आमिष अथवा प्रलोभनास बळी पडल्यास हे कार्यालय कुठल्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी. तसेच उमेदवारांनी याबाबत आपली तक्रार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांचेकडे किंवा ०७१३२-२९९५२३ या क्रमांकावर नोंदवावी.**

२२) भरती प्रकियेचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**भरतीचे वेळापत्रक**

| विवरण | दिनांक |
|---|---|
| Google Form Link च्या माध्यमातून फक्त Online स्वरुपात अर्ज सादर करणे. | दिनांक ०६./०१./२०२६ ते दिनांक २०./०१./२०२६ रोजी रात्रौ ११.५० वाजेपर्यंत |
| उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची पडताळणी करणे. | दिनांक २१./०१./२०२६ ते दिनांक ०२./०२./२०२६ पर्यंत (सदर तारिख संभाव्य असून उमेदवारांनी संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.) |

अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

सदस्य सचिव
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

**प्रतिज्ञापन**
**नमूना-४**
**(नियम ४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी ..................................................

श्री. .......................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय ........ वर्षे, राहनार ...................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ................................................ या पदाकरीता माझा अर्ज दाखल केलेला असून माझा अर्ज क्रमांक ............. हा आहे.

२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**(टिप : अविवाहित उमेदवारांनी “लागू नाही” असे नमूद करुन स्वाक्षरी करावी.)**

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी
(पुर्ण नांव ...................................)